आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
७ जुलै २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि इंडोनेशिया दरम्यान संरक्षण तंत्रज्ञान आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रातल्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या

- इंडोनेशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान बिनतांग आदिपूर्णा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना बहाल

- अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात ३८ जणांना फाशी तर इतर ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयात कायम

**आणि**

- मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणे विधान परिषदेत मांडली जातील असं राज्य सरकारचं आश्वासन

**<><><><><>**

भारत आणि इंडोनेशियामधल्या भागीदारीचा नवीन सुवर्ण अध्याय आजपासून सुरु झाला आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. ते इंडोनेशियात जकार्ता इथं इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरची चर्चा केल्यानंतर संयुक्त निवेदन देत होते. उभय देशांमधली ही भागीदारी संरक्षण, तंत्रज्ञान, संस्कृती, शिक्षण, विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये आगेकूच करत आहे, असं मोदी म्हणाले. परस्पर हिताच्या क्षेत्रांमधलं सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी आज उभय देसांमध्ये अनेक सामंजस्य करार झाले. या करारांमुळे भारतात बनलेली उच्च दर्जाची औषधं इंडोनेशियात परवडणाऱ्या किमतीत मिळू शकतील, इंडोनेशियातले डॉक्टर्स आणि आरोग्य क्षेत्रातले इतर व्यावसायिक यांच्या क्षमता बांधणीमध्ये भारत योगदान देऊ शकेल, तसंच भारतीय गव्हाच्या वाणामुळे इंडोनेशियाची अन्न सुरक्षा मजबूत होईल, असं प्रधानमंत्र्यांनी स्पष्ट केलं . अत्यावश्यक खनिजं आणि पोलाद यांच्या पुरवठा साखळीबाबतही दोन्ही देशांमध्ये सहमती झाल्याचं त्यांनी सांगितलं. आय आय एम बंगळुरूचं संकुल इंडोनेशियात सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**.... होल्ड- बाईट - प्रधानमंत्री - - -**

याशिवाय, कृत्रिम बुद्धिमत्ता, दूरसंचार, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि स्टार्टअप्स या क्षेत्रांतलं सहकार्य अधिक व्यापक करण्याची घोषणाही प्रधानमंत्र्यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज राष्ट्रपती सुबियांतो यांच्या हस्ते बिनतांग आदिपूर्णा हा इंडोनेशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत यंदाच्या ड्युरांड कप फुटबॉल स्पर्धेचं उदघाटन झालं. या ऐतिहासिक स्पर्धेत खऱ्याखुऱ्या खिलाडूवृत्तीचं प्रदर्शन होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यंदा या स्पर्धेत श्रीलंकेसह इतर संघांचा नव्यानं समावेश झाला आहे. हे या स्पर्धेच्या लोकप्रियतेचं द्योतक असल्याचं त्या म्हणाल्या.

**- - होल्ड - बाईट - --**

**<><><><><>**

केरळमध्ये कोची इथे उद्यापासून दोन दिवसीय ब्रिक्स महिला मंत्रीस्तरीय बैठक सुरू होत आहे. भारताने आयोजित केलेल्या या बैठकीत महिलांच्या नेतृत्वाखाली विकासासाठी सहकार्य बळकट करण्याच्या दृष्टीने ब्रिक्स सदस्य देशांचे मंत्री चर्चा करतील. संबंधित विषयातले तज्ञ, धोरणकर्ते आणि व्यावसायिकांच्या विशेष चर्चा सत्राचं आयोजनही या बैठकीत करण्यात आलं आहे. या चर्चासत्रात त्यांना अनुभव आणि नाविन्यपूर्ण दृष्टीकोन सामायिक करण्याची तसंच महिला सक्षमीकरणासाठी भागीदारी वाढवण्याची संधी मिळेल. महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे, आर्थिक संधींचा विस्तार करणे आणि डिजिटल तसंच आर्थिक समावेश मजबूत करणे यावर उच्च-स्तरीय संवादासाठी एक व्यासपीठ म्हणून ही बैठक होत आहे.

**<><><><><>**

अहमदाबाद इथे २००८मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातल्या ३८ दोषींना फाशी तर इतर ११ जणांना जन्मठेप देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती ए. वाय. कोगजे आणि न्यायमूर्ती समीर दवे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणी विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरोधातले सर्व दावे उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. २६ जुलै २००८ रोजी अहमदाबादमध्ये ७० मिनिटांत २१ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. त्यात ५६ जणांचा मृत्यू

झाला होता तर २०० जण जखमी झाले होते. या घातपातात इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेच्या ३८ सदस्यांना २०२२मध्ये विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा तर इतर ११ दोषींना जन्मठेप सुनावली होती.

<><><><>

भारतातून जगातल्या अनेक देशात चामडे आणि चपलांची निर्यात साडेचार अब्ज डॉलर्स पर्यंत पोहचली आहे अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. नवी दिल्लीत काल चामडे निर्यात परिषदेत राष्ट्रीयस्तरावरील उत्कृष्ट निर्यात पुरस्कारांच वितरण गोयल यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. गोयल म्हणाले की सध्या एकूण चर्मोद्योग निर्यातीपैकी ७७ टक्के माल केवळ १५ देशांमध्येच पाठवला जातो. जगातल्या ३८ विकसित देशांनी मुक्त व्यापार कराराद्वारे आपली बाजारपेठ खुली केली असून, या देशांमध्ये चामडयापासून तयार करण्यात येणाऱ्या चपलांप्रमाणेच छोट्या मोठ्या पर्स, जॅकेट, कपडे, शोभेच्या वस्तू अशा विविध वस्तूंच्या निर्यातीसाठी मोठा वाव आहे.

<><><><>

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणे सरकार शोधत आहे. ही कारणे सभागृहात मांडली जातील असं निवेदन मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिलं. हे सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. निसर्गाच्या अवकृपेने नेहमीपेक्षा चौपट पाऊस झाल्यानं ही समस्या निर्माण झाल्याचं ते म्हणाले. देहू आणि आळंदीहून निघणाऱ्या पालख्यांमधल्या वारकऱ्यांना पावसात सरकार काही मदत करणार का यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

<><><><>

महाराष्ट्रात सध्या सुमारे चार ते साडे चार लाख बेकायदा बाईक टॅक्सी रस्त्यावर धावत असून आरटीओ वेळोवेळी त्यांच्यावर कारवाई करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यात फक्त इलेक्ट्रॉनिक बाईक्सना परवानगी देण्यात आली होती, पण पेट्रोल बाईक्स सर्रास रस्त्यावर उतरल्या, त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालायचा निर्णय सरकारने घेतला. पण देशभर सगळीकडे एकाच ॲपद्वारे या कंपन्या काम करत असल्यामुळे ही बंदी मागे घ्यावी लागली, असं ते म्हणाले. येत्या १ ऑगस्टपासून अशा सर्वच प्रकारच्या

वाहनांमधून सेवा पुरवण्यासाठी डोमिसाईल प्रमाणपत्र सक्तीचं केलं जाणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

पुणे शहरात पॉक्सो अंतर्गत ३ हजार ५५८ खटले प्रलंबित असून यापैकी ६ पॉक्सो विशेष न्यायालयांमध्ये २ हजार ८०३ खटले प्रलंबित आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महिलांवरचे बलात्कार आणि बालकांवरच्या अत्याचाराची प्रलंबित प्रकरणं हाताळण्यासाठी १०८ विशेष जलदगती न्यायालयं, आणि पॉक्सो अंतर्गत ३० विशेष जलदगती न्यायालयं अशी एकंदर १३८ विशेष जलदगती न्यायालयं स्थापन करायला मान्यता दिली आहे, मात्र न्यायाधीशांच्या अभावी यापैकी फक्त ५८ न्यायालयं कार्यान्वित आहेत. या न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देणं हे न्यायव्यवस्थेचं काम आहे, त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाशी सतत पाठपुरावा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत अमेरिकेत डल्लास इथं काल झालेल्या सामन्यात पोर्तुगालचा १-० ने पराभव करत स्पेनने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. स्पेनने २०१० मध्ये फिफा विश्वचषक जिंकला होता त्यानंतर प्रथमच स्पेन उपान्त्य पूर्व फेरीत पोहचला आहे. अमेरिकेवर ३विरुद्ध ४गोल ने विजय मिळवणाऱ्या बेल्जियम बरोबर स्पेनची उपांत्यपूर्व फेरीतली लढत असेल. इंग्लंडने मेक्सिकोवर ३ विरुद्ध २ असा विजय मिळवून उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या ब्राझिलला नॉर्वेकडून पराभव पत्करावा लागला. आता उपान्त्यपार्व फेरीत इंग्लंड विरुद्ध नॉर्वे असा सामना रंगेल. राऊंड ऑफ सिक्सटीन मधले शेवटचे दोन सामने शिल्लक आहेत. त्यात आज अर्जेंटिनाची लढत इजिप्तबरोबर होईल, तर उद्या स्विट्झर्लंडचा सामना कोलंबियाबरोबर होईल.

//<><><><><>//